# दोन महान समाजसेवक

१२६८ दि० २०।५।८७
बा० वा०

: लेखक :

दत्ता. जी. कुलकर्णी

BVBK-0401268

: प्राप्तिस्थान :

अरगडे आणि मंडळी
अप्पा बळवंत चौक
पुणे २

सौ. मालिनी कुलकर्णी
२४३ बद्रिकाश्रम, १ ली खेतवाडी
गिरगांव, मुंबई-४

अरगडे कुलकर्णी प्रकाशन, पुणे ९

किंमत पन्नास पैसे

## प्रकाशकीय

किशोरांसाठी विविध मनोरंजक व उद्‌बोधक पुस्तकें प्रकाशित करण्याचा संकल्प आहे. आजपर्यंत प्रकाशित झालेली पुस्तकें किशोरांना फारच आवडली.

'दोन महान समाजसेवक' हे असेच उद्‌बोधक आणि संस्कारक्षम पुस्तक किशोर मित्रांना खासच आवडेल. संस्कारक्षम बालमनावर मनोरंजनाद्वारे संस्कार–म्हणजेच उत्तम पुस्तकें, त्यासाठीच प्रत्येकाने आमची प्रकाशने आपल्या संग्रही ठेवावीत.

■■

प्रकाशिका :
*सौ. निर्मला नारायण अरगडे*
अरगडे कुलकर्णी प्रकाशन
१६/२२४, लोकमान्यनगर, पुणे ९
मुद्रक :
*बाबर व भंडारी कं.*
३४२ नारायण पेठ, पुणे २

प्रथमावृत्ति १५ ऑगस्ट १९६८

[ सर्व हक्क प्रकाशिकेच्या स्वाधीन ]

१२६८ दि. २०।५।८९
वा.वा.

# १. महात्मा जोतिराव फुले



इंग्रज अमदानीत महाराष्ट्रात इंग्रजांनी आपल्या मताप्रमाणे इंग्रजी शिक्षणाच्या शाळा देशातल्या प्रमुख शहरी सुरू केल्या. भारतातल्या लोकांना शिक्षण देण्याचा उद्देश इंग्रजी साम्राज्यात नोकरशाही निर्माण करणे हा होता. साम्राज्याचा गाडा ओढण्यासाठी नोकरशाहीचे बैल निर्माण करणे हेच ध्येय इंग्रज सरकारच्या मनी होते.

पण झाले उलटे. विचारवंताला इंग्रजीचे शिक्षण हे वाघिणीचे दूध ठरले. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ या न्यायाप्रमाणे इंग्रजांना

त्यांच्याच इंग्रजीच्या शिक्षणाच्या संस्कारामुळे आपले भारतातील साम्राज्य अखेर गमवावे लागले.

आज महाराष्ट्रात खेडोपाडी हायस्कुले निघत आहेत. प्राथमिक शाळा बहुतेक खेडेगावातून सरकारने सुरू केल्या आहेत. हे प्राथमिक शिक्षण-सुद्धा आज सक्तीचे आणि मोफत असे मिळू लागले. १२०० रु. इतके कमी उत्पन्न असलेल्या कोणत्याही गरीब महाराष्ट्रीयाला आज माध्यमिक आणि विश्वविद्यालयीन शिक्षण मोफत उपलब्ध झाले आहे. पण मुलांबरोबर मुलींच्याही शाळा आणि कॉलेजे मोठ्या संख्येने कार्य करीत आहेत. पण सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रातच काय उभ्या हिंदुस्थानात मुलींसाठी एकही प्राथमिक शाळा उपलब्ध नव्हती. हे आपणाला आज खरे वाटेल का ?

पण हे खरे आहे. मुलींसाठी हिंदुस्थानात पहिली शाळा प्रथम पुण्यात निघाली. ती शाळा १८४८ साली पुण्यात कोणी स्थापन केली ? त्या शाळेचा संस्थापक होता नवविचार-प्रसारक जोतिबा फुले !

जोतिबांच्या वडिलांचे नांव गोविंदराव होते. आईचे नाव चिमणाबाई होते. १९२७ साली त्यांना जरा उशिरा जो मुलगा झाला तो जोतिबा होय.

तो लहान असताना त्याची आई वारली. पण गोविंदरावाने दुसरे लग्न केले नाही. जोतिबा आईविना वाढू लागला. आपल्या मुलाला शिकवून मोठे करावे असे त्यांना वाटले. तेव्हां पुण्यात एकच शाळा होती. त्या शाळेत अखेरीस जोतिबांचे नाव वयाच्या सातव्या वर्षी गोविंदरावाने घातले.

अभ्यासात त्याला गोडी वाटू लागली. तो वडिलांबरोबर बागेत काम करी. मधून मधून पुण्यातील लष्कर भागात असलेल्या लहुजी बुवांकडे मर्दानी शिक्षण घेण्यासाठी जाई. व्यायाम घेई वयाच्या २१ व्या वर्षी

इंग्रजी सातवीत असताना म्हणजे हल्लीच्या S. S. C. चा अभ्यास पूर्ण करून त्याने शिक्षणाला राम राम ठोकला.

त्याच्या मित्राचे लग्न होते. मित्राने खूप आग्रह केला म्हणून तो त्या लग्नाला हजर राहिला. त्याचा मित्र ब्राह्मण असल्याने लग्न अर्थातच ब्राह्मणाचे होते. तो मित्र त्याच्याशी चांगला वागत होता. पण जुनाट विचारांचे कांही म्हातारे लोक लग्नाच्या मिरवणुकीत होते. त्यांच्यापैकी एकाने जोतिबाला पाहिले. ब्राह्मणांच्या मिरवणुकीत जोतिबा कशाला? इत्यादि अपशब्द एक म्हातारा जोतिबाला ऐकू जाईल असे बोलला. दुसऱ्या म्हाताऱ्याने जोतिबाची समजूत घालून त्याला त्या सोहोळ्यातून घरी पाठविले. तरुण मनाच्या जोतीबाला हे लागले. त्याला या वागण्यातला अर्थ कळेना. पण शिवाशिवीचा तो अजब प्रकार पाहून त्याला जसे वाईट वाटले तसा रागही आला.

शिवाशिव मानणाऱ्या, आपल्याच बांधवाचा विटाळ झाला असे समजणाऱ्या अशा धर्मभोळ्या लोकांना शिक्षण देण्याचे ठरविले. सरकारी नोकरीच्या भानगडीत न पडता त्याने १८४८ साली मुलींसाठी हिंदुस्थानात पहिली शाळा पुणे येथे काढली. मुलांसाठी इंग्रज सरकारने नुकत्याच शाळा सुरू केल्या होत्या. जी गोष्ट सरकारने केली नाही. तिकडे जोतिबाने लक्ष वळविले.

याच सुमारास त्यांचे पुण्याजवळील कवठे गावच्या झगडे पाटलांच्या सावित्रीबाईशी विवाह झाला. सावित्रीला अक्षरओळख नव्हती. पण तीन वर्षे जोतिबाने खूप परिश्रम घेऊन आपल्या पत्नीला मुलींना शिकविता येईल इतके शिक्षण स्वतः दिले. ते आणि त्यांची पत्नी हे दोघेच काय ते शाळेत शिकवू लागले. पुण्यातील काही लोकांना हे पाहवले नाही. खोट्या कल्पनांचा ज्यांचा मनावर पगडा होता अशा

अनेक ब्राह्मण-मराठा लोकांनी जोतिबाच्या या स्त्रीशिक्षणाला विरोध केला. प्रत्यक्ष त्यांच्या वडिलांनी त्यांना घराबाहेर काढले.

पण ते डगमगले नाहीत. विरोधाला त्यांनी भीक घातली नाही. वडिलांनी हुसकून दिल्याने पोटासाठी कांही तरी उद्योग पाहाणे आता आवश्यक झाले. कारण शाळेतून पोटाला मिळेल अशी काही प्राप्ती नव्हती. अखेरीस त्यांनी घरे, पूल, रस्ते तयार करण्यासंबंधी मक्ते घ्यायला सुरुवात केली. आणि त्यांत त्यांना चार पैसे मिळू लागले. पोट भागू लागले. शाळा व्यवस्थित चालू लागली.

१८५३ साली या शाळेच्या तीन शाखा निघाल्या. एक रास्ता पेठेत एक वेताळ पेठेत आणि मूळची बुधवार पेठेत आणि या तिन्ही शाळेतून १८५३ साली २३७ मुली शिकत होत्या. भारतात एका शहरात एवढ्या संख्येने कुठेच मुली त्या काळी शिकत नव्हत्या. पुण्यातील सनातनी लोक मात्र सावित्राबईना शाळेत जाता येता त्रास देऊ लागले. आजसुद्धा शाळेतल्या मुलींची, मास्तरणींची टिंगल करण्याची प्रवृत्ती समाजात कमी झालेली नाही. असे टवाळ नेहमीच समाजात वावरत असतात. त्याकाळी असेच टवाळ सावित्राबाईंना त्रास देत असतील. पण त्याचे खापर मात्र एका विशिष्ट जातीच्या लोकांच्या डोक्यावर फोडण्यात आले आहे. ही दुर्दैवाची गोष्ट होय.

नेटाने कोणतीही चांगली गोष्ट माणूस करीत राहिला की ती गोष्ट जर चांगली असेल तर समाजात ती रुजल्यावाचून राहात नाहीत. जोतिबाच्या स्त्री-शिक्षणाचे असेच झाले. स्त्री-शिक्षणाविरुद्ध असलेला टवाळांचा विरोध जरा कमी झाला. तेव्हा त्यांनी आपले लक्ष दुसऱ्या कार्याकडे वळविले.

अस्पृश्यांना ब्रिटिशांच्या गावठी शाळेतसुद्धा शिकण्याला मनाई होती. शिक्षणाचे दार त्यांना बंद होते. तेव्हां अस्पृश्यांसाठी पहिली

शाळा पुण्याच्या नानापेठेत त्यांनी सुरू केली अर्थात याही गोष्टीला समाजातील काही लोकांनी विरोध केला. पण कालांतराने तो विरोध कुचकामी टरला. इंग्रज सरकारचे जोतिबांच्या या शिक्षण कार्याकडे लक्ष होते त्यांच्या कामाचा गौरव म्हणून १८५२ साली पुण्यातील विश्रामबाग वाड्यात ब्रिटिश सरकारने त्यांच्या शिक्षण कार्याचा गौरव समारंभ घडवून आणला. त्यांना २०० रु. किंमतीची शाल सरकारने अर्पण केली. तेव्हा केलेल्या भाषणात ते म्हणाले, " मी कांही विशेष केले आहे असे मला वाटत नाही, फक्त मी माझ्या कर्तव्याला जागलो. सरकारने तातडीने स्त्री-शिक्षणाचा प्रश्न हाती घ्यावा. " अर्थात ब्रिटिश सरकारने तात्रडतोब मुलींच्या शाळा काढण्याचा हुकूम आपल्या शिक्षणखात्याला दिला.

पण केवळ एवढ्याशा कामाने समाधान मानणारा हा समाज सुधारक नव्हता. समाजाकडे तो उघड्या डोळ्याने पाहात होता. समाजातील वाईट गोष्टी त्याच्या सुधारकी डोळ्यांना आता स्पष्ट दिसू लागल्या होत्या. महाराष्ट्रात ज्या अनेक सुधारणा समाज सुधारकांनी अंगिकारल्या आणि त्यासाठी आपला सर्व जन्म घालवला अशा अनेक सामाजिक सुधारकांचा पाया जोतिबाने घातला.

विधवाविवाह हा महाराष्ट्रात त्यांच्याच प्रेरणेने सर्वात प्रथम ८ मार्च १८६० रोजी गोखल्यांच्या बागेत पुण्याला घडून आला. समाजातील वधूवरांचा तो पुनर्विवाह होता. विवाहाला खूप विरोध झाला. परंतु या साऱ्या विरोधकांना त्यांनी स्पष्ट बजावले, " एखाद्या स्त्रीचा नवरा ज्यावेळेस मृत होतो त्यावेळेस ती दुःखसागरात बुडून तिला फार संकटे भोगावी लागतात. मरेपर्यंत सारा काळ वैधव्यात काढावा लागतो. इतकेच नव्हे तर पूर्वी कित्येक ' सती ' देखील जात असत; परंतु पुरुषाला

ा : याविषयी दुःख होऊन तो कधी ‘सती’ गेलेला ऐकला आहे काय? तो लागेल तितकी लग्ने करू शकतो, तशी स्त्रियांची स्थिती नाही.”

बालहत्या प्रतिबंधकगृह त्यांनी पुण्यातील आपल्या घरात सुरू केले होते. पुरुषाच्या वासनेला बळी पडून एखाद्या स्त्रीचे जर वाकडे पाऊल प ड ले तर तिला आयुष्यातून उठावे लागते. यासाठी त्यांनी १८६४ ा ली असे एक बालहत्या प्रतिबंककगृह आपल्या राहत्या वाड्यात-पुण्यात–सुरू केले. कोणा विधवेचे अज्ञानपणाने वाकडे पाऊल पडून ती गरोदर झाली तर तिने आपल्या घरात गुप्तपणे बाळंत होऊन जावे अशा मोठमोठ्या जाहिराती त्यांनी पुण्यात प्रमुख ठिकाणी लावल्या. बदफैली पुरुष वर्गाला अर्थातच याचा संताप आला पण स्त्रियांना मात्र या गो ी चा आधार वाटला.

केशवपन, द्विभार्या प्रतिबंधन ह्या गोष्टींना प्रथम त्यांनी विरोध केला. स्वतःला मूल होत नसताना प्रत्यक्ष वडील आणि सासरे दुसऱ्या लग्नाची गळ घालीत असता त्यांनी त्या गोष्टीला साफ नकार दिला. व शे ा टपर्यंत एक पत्नीव्रत त्यांनी पाळले.

१८६८ साली त्यानी आपल्या राहत्या वाड्यातील पाणी पिण्याचा हौ द हरिजनांना खुला केला. गांधीजींचा जन्म होण्या अगोदर हरि-ज न ांच्या ज्ञानाची तहान आणि प्रत्यक्ष पाण्याची सोय भारतात करणारा थोर सुपुत्र म्हणजे जोतिबा होय.

जोतिबाने जे जे केले त्या त्या गोष्टीला आपल्या स्वतःच्या घरापासून सुरुवात केली. म्हणूनच त्यांच्या सुधारणा बोलघेवड्या ठरल्या नाहीत. तर ‘आधी केले मग सांगितले’ याचा भक्कम पाया त्यांच्या प्रत्येक कार्याला मिळत गेल्याने ते कार्य लोकांच्या डोळ्यात भरत गेले, आणि अशिक्षित जनतेला हलके हलके त्यांच्या कार्याची महती पटू लागली. आणि सुशिक्षितांना ती उमगू लागली.

१८६४ साली त्यांचे वडील गोविंदराव वारले. मरणापूर्वी त्यांनी आपल्या मुलाला आणि सुनेला घरात घेतले होते.

सार्वजनिक बांधकामाशी त्यांचा संबंध येत असल्याने मजुरांची वाईट स्थिती त्यांनी जवळून पाहिली. खडकवासल्याच्या तलावाचे दगड पुरविण्याचे कंत्राट त्यांना मिळाले होते. येरवड्याच्या पुलाचा चुना पुरविण्याचे कंत्राटसुद्धा त्यांना मिळाले होते. स्वतःचे काम चोख बजावीत असता मजुरांचे शोषण करणारे लोक जिथे जिथे त्यांना दिसले, तिथे तिथे त्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. सरकारकडे तशी तक्रार करून मजुरांचे गाऱ्हाणे त्यांनी वेशीवर टांगले. कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा जन्मही झाला नव्हता, त्यावेळी जोतिबा भारतात आपल्या परीने मजुरांचा प्रश्न सोडवीत होते.

शेतीस उत्तेजन देण्यासाठी त्यांनी शेतीसुधारणेवर बक्षिसे ठेवून निबंध मागविले होते. १८८९ साली मुंबईला भरलेल्या काँग्रेसच्या प्रवेशद्वारापुढे शेतकऱ्याचा पुतळा उभारून त्यांनी राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या निदर्शनास भारतातील शेतकऱ्याचे दैन्य आणले होते.

शिवाजीबद्दल प्रत्येक महाराष्ट्रीयन माणसाला आदर आणि प्रेम असते शिवरायाची समाधी रायगडला जाऊन प्रत्यक्ष पाहावी अशी इच्छा त्यांच्या मनात खूप दिवसांपासून घोळत होती. पण अनेक कामामुळे वेळ मिळत नव्हता. १८६९ साली त्यांनी शिवाजीवर एक पोवाडा लिहिला पण त्याने समाधान होईना. अखेरीस ते रायगडला पोचले पण त्यांना समाधी भग्न झालेली दिसली. उंच उंच गवत भोवती वाढलेले दिसले त्यांना वाईट वाटले. त्यांनी विस्कटलेले दगड एकत्र ठेवले, शेजारच्या टाक्यातून पाणी आणून ते स्वच्छ धुतले. रानफुले गोळा करून ती शिवचरणी अर्पण केली.

जोतिबाने आपल्यापरीने समाजात सुधारणा घडावी म्हणून जशी प्रत्यक्ष कार्याला सुरुवात केली होती तशीच त्या सुधारणांचे लोण सर्वत्र

पसरावे म्हणून त्यांनी काही निबंध व काही ग्रंथ लिहिले. या साऱ्या लिखाणाचा रोख समाजात दिसत असलेली बेबंदशाही नष्ट करणे व समाज बलशाली करणे असा होता. पण प्रखर विरोधामुळे धारदार शब्द निर्माण झाले. काही काही विषयावर त्यांनी असा काही हल्ला चढविला की त्यामुळे समाजाचे भोंदू लोकांना ते अंजन झोंबले.पण विचारवंतानासुद्धा त्यांच्या त्या लिखाणाचा विचार करणे भाग पडले.

'गुलामगिरी' यात ब्राह्मणांवर हल्ला चढवून हिंदू देवतांचे जे अवतार मानले जातात त्यांचा अवमान या ग्रन्थात केला आहे.

'ब्राह्मणांचे कसब' यात ब्राह्मण धर्माच्या आणि देवाच्या नावावर अज्ञानी जनतेची कशी नागवणूक करतात हे या काव्यातून दाखविले आहे.

जातीभेद, विवेकसार यात जातीची निर्मिती काही मूठभर लोकांच्या स्वार्थासाठी करण्यात आली आहेत व यांचे परिणाम किती वाईट होत आहेत ते यात दाखवले आहे. हे पुस्तक खरे तर पडवळ नामक त्यांच्या मित्राचे पण आपल्या नावावर प्रसिद्ध करण्याचे धैर्य त्याला नसल्याने ते जोतिबाने आपल्या नावावर प्रसिद्ध केले. वरील तिन्ही ग्रंथ लेखकाने ज्या उद्देशाने समाजापुढे आणले तो उद्देश वाईट होता असे कोण म्हणेल ? पण ब्राह्मणांवर हल्ला चढवताना सारेच ब्राह्मण एका माळेचे मणी आहेत असे प्रत्यक्ष जोतिबांनासुद्धा म्हणण्याचे धाडस झाले नसते. त्यांचे काही मित्र, धंद्यातील काही सहकारी आणि सत्य-शोधक समाजातील त्यांचा विचारांचा प्रचार करणारे काही विचारी ब्राह्मण होते हे कोणीही नाकबूल करणार नाही. ब्राह्मणच कशाला उच्च पदस्थ स्वार्थी माणूस आपल्या स्वार्थासाठी आपल्या अधिकाराचा दुरु-पयोग आजही करीत नाही काय? ज्या बहुजन समाजाचा कैवार जोतिबाने त्यावेळी घेतला ते जर आज प्रकट झाले तर त्यांना कोणते दृष्य दिसेल ? शिवाजीचा पोवाडा, शेतकऱ्यांचे हासू, इशारा, अस्पृ-

श्यांची कैफियत, काही स्फुट अभंग, सत्यशोधक समाजाने मान्य केलेल्या संस्कारविधींचे पुस्तक आणि एक नाटक इ. बहुविध साहित्य या कर्मयोग्याने समाजहितासाठी तळमळीने लिहिले.

जोतिबाचे नाव महाराष्ट्रभर पसरले. ते त्यांच्या सत्यशोधक समाजाचा स्थापनेमुळे. १८७३ ला त्यांनी या समाजाची स्थापना केली. सत्याशिवाय दुसरा धर्म नाही. त्याच्या भक्तीसाठी भट-दलालाची जरुरी नाही. मनुष्य जातीने श्रेष्ठ नसून तो गुणाने श्रेष्ठ ठरतो. कोणताही ग्रन्थ सर्वांशी प्रमाण व ईश्वरप्रेषीत नाही. परमेश्वर सअवयव रूपाने अवतार घेत नाही. पुनर्जन्म, कर्मकहाणी, जपतप या गोष्टी अज्ञानमूलक आहेत, ही या समाजाची प्रमुख तत्त्वे. महाराष्ट्रातल्या सातारा, कोल्हापूर, बेळगाव, मुंबई येथून ५० ते ६० माणसे पुण्याला या पहिल्या सभेसाठी हजर राहिली होती. यात ब्राह्मण, मराठा, महार, खिस्ती, मुसलमान इत्यादी जातीधर्माचे लोक हजर होते.

या समाजाचा प्रसार सातारा, कोल्हापूर मुंबई या भागात नंतर सुरू झाला. लोकशाळा स्थापन झाल्या. लग्नासाठी भट-दलाल नको म्हणून जोतिबाने रचलेली मंगलाष्टके लग्नाच्या वेळी वधूवरांनी म्हणून एकमेकांच्या गळ्यात माळा घालून भटाशिवाय लग्न उरकून घ्यायची पद्धत सत्यशोधक समाजाने सुरू केली. जेमतेम १८७३ साली एक, १८७४ साली दुसरे आणि १८७९ साली तिसरे अशी तीन लग्ने या पद्धतीने मोठ्या उत्साहाने पार पाडली. दुसऱ्या लग्नाच्या वेळेला पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अर्थात ज्यांचे पोट भिक्षुकीवर अवलंबून आहे. अशा लोकांनी या प्रकाराविरुद्ध सरकारकडे तिसऱ्या लग्नाच्या वेळी फिर्याद गुदरली; ब्रिटिश सरकारचाच न्याय तो. न्यायदेवता आंधळी असतेच आणि न्याय देणारा ब्रिटिश जज्ज याला भारतात दुहीचे बीज पेरायचे होते म्हणून त्या सरकारने एकदा भटांच्या बाजूने तर दोनदा

सत्यशोधक समाजाच्या बाजूने निकाल देऊन आपली न्यायदेवता कशी कार्य करते ते महाराष्ट्राला दाखवून दिले. पण यामुळे महाराष्ट्रात ब्राह्मण अब्राह्मण वाद भडकण्याला अधिकच त्यांनी हातभार लागला असे खेदाने म्हणावे लागते.

माणूस कितीही मोठा असला त्याचे विचार कितीही चागले असले तरी ते समाजापर्यंत पोहोचण्याचे साधन त्याच्या जवळ नसेल तर आजच्या या यंत्र युगात त्याचा विचारमंत्र लोकापर्यंत पोहोचणे कठिण होते. आणि ज्याच्या हाती वर्तमानत्र त्याचेच ज्ञानसत्र लोकांना खुले होते. त्यासाठी दीनबंधू नावाचे साप्ताहिक १८७७ साली जानेवारीत त्यांच्या प्रेरणेने भालेकरांच्या संपादकाखाली काढाण्यात आले. पण याचवर्षी मोठा दुष्काळ पडला. ह्या वर्तमानपत्राने दुष्काळाची स्पष्ट माहिती ब्रिटिश सरकारला दिली. त्यांच्या त्या विदारक माहितीमुळेच सरकार जागे झाले. दुष्काळाची कामे सुरू झाली. सरकारने स्वस्त धान्याची मदत सुरू केली.

ब्रिटिश सरकारने राजद्रोहाच्या आरोपाखाली टिळक-आगरकरांना १८८२ साली पकडले. तेव्हां त्यांना १०१ दिवसांची शिक्षा झाली. डोंगरीच्या तुरुंगांतून सुटून ते दोघे बाहेर आल्यावर मुंबईतील बहुजन समाजाने त्यांची थाटाने मिरवणूक काढली. हार-तुरे आणि शेला-पागोटे देऊन त्यांचा सत्कार केला. आणि ब्रिटिश सरकारच्या अन्यायी वर्तनाबद्दल या सभेत पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणावर निषेध व्यक्त करण्यात आला. पुण्याला प्रत्यक्ष जोतिबांनी ह्या दोघांचा मोठा सत्कार करून सरकारच्या जुलमाविरुद्ध कडाडून हल्ला केला.

जोतिबा खरे समाजसुधारक होते. पण प्रत्येक ठिकाणी त्यांना आर्यभट दिसले की त्यांच्या गुणापेक्षा त्यांचे शेकडो वर्षांचे दोषच दिसत. त्यामुळे अज्ञानीं बहुजन समाजाच्या प्रेमापोटी ते प्रत्येक वेळेला

ब्राह्मणावर आणि त्यांच्या संस्थावर कडकडून हल्ला करीत. कॉंग्रेसमध्ये तसे पाहिले तर केवळ ब्राह्मण नव्हते. पण आमच्या गुणामुळे आणि सामाजिक तळमळीमुळे भारतातील काही विचारवंत तेव्हा कॉंग्रेसमध्येच शिरले. पण आज मात्र सतत ब्राह्मणांच्या विरुद्ध विषारी प्रसारामुळे या राष्ट्रीय सभेस कोणाचा भरणा दिसत आहे. आणि जोतिबाने केलेली टीका आता कोणावर बरे उलटत आहे? जोतिबा आज हयात असते तर कॉंग्रेसचे हे स्वरूप पाहून स्वस्थ बसले असते का? पुण्यात सार्वजनिक सभा याच काळात ग. वा. जोशी यानी स्थापन केली होती. या दोन्ही संस्थाबद्दल जोतिबा आपल्या 'सार्वजनिक सत्य धर्मात' लिहितात, "धूर्त आर्यभट ब्राह्मणांच्या मुलानी ज्या सभा उपस्थित केल्या आहेत. त्यापैकी पुणे येथे सार्वजनिक सभा आणि नॅशनल कॉंग्रेस."

१८८५ साली पुण्यात गुढीपाडव्याचे दिवशी सत्यशोधक समाजाची १२ वर्षे झाली म्हणून मोठी मिरवणूक काढण्यात आली होती. नंतर सत्यशोधक समाजाची वार्षिक सभा ठाण्याला घेण्यात आली, सत्यशोधक समाजाच्या कामाकडे बडोद्याच्या सयाजीराव गायकवाडांचे लक्ष गेले. त्यांनी त्यांना बडोद्यालाच भेट देण्याचे निमंत्रण दिले. कार्यधुरंधर दोन महाराष्ट्र सुपुत्रांची बडोद्याला गाठ पडली.

पुण्याला सध्या ज्या ठिकाणी मंडई आहे आणि ज्या मंडईला फुल्यांचे नाव दिले आहे ती मंडई बांधायला फुल्यांनी विरोध केला होता हे सांगून तरी खरे वाटेल का? जुनी मंडई मोडकळीस आली होती. आणि नवीन मंडई बांधायची असे पुणे महानगरपालिकेत ठरविण्यात आले. तेव्हा लाखो रुपये दगड मातीत घालवण्यापेक्षा नगरपालिकेच्या हद्दीत सक्तीचे आणि मोफत शिक्षण सुरू करावे असा त्यांचा आग्रह होता. त्यांनी सभा घेतल्या, दीनबंधूतून लिहिले. पण अखेरीस त्यांच्या विरो-

धाचा काहीही परिणाम झाला नाही आणि मंडई बांधली गेली. कालांतराने त्यांचेच नाव आता त्या मंडईला देण्यात आले आहे.

मे महिन्याच्या १९ तारखेला १८८८ साली त्यांच्या वयाला ६० वर्षे पूर्ण झाली म्हणून एक विशाल समारंभ कोळीवाडा हॉल मुंबईच्या सत्यसमाजाने केला. एक कार्यकर्ते रावबहाद्दूर वांडेकर यानी जोतिबांना 'महात्मा' ही पदवी अर्पण केली.

याच वर्षी त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' नावाचे पुस्तक अर्धांगवायूने शरीर अर्धे दुबळे झाले असताही लिहून पूर्ण केले. आपल्या निरनिराळ्या भाषणात त्यांनी सत्यशोधक समाजाची तत्त्वे मांडली आहेत त्यातील बहुतेकांचा अंतरभाव या ग्रंथात करण्यात आला आहे. अर्थात समाज तळमळ आणि कळकळही या ग्रंथातून प्रकट होते. पण त्यांचे ते सारेच विचार आणि सार्वजनिक सत्यधर्माविषयीचे त्यांचे अडाखे आज ८० वर्षानंतर तपासून पाहिले तर काही सत्यसृष्टीत उतरले आहेत तर काही अर्थातच पुस्तकी राहिले आहे.

जोतिबांना आपल्या कार्यात पत्नीचे बहुमोल सहाय्य झाले. मूळची अशिक्षित असून सुद्धा सावित्रीबाईबाई कर्तव्य म्हणून पतीने जे शिकवले ते शिकली. त्यांनी जे सांगितले ते कार्यप्रमाण मानून आयुष्यभर पतीच्या मरणापर्यन्त सांभाळले. सुरुवातीला नाना प्रकारचा छळ त्यांना सोसावा लागला. पण माहेरच्या झगडे आडनावाप्रमाणे त्या आयुष्यभर समाजाशी झगडत राहिल्या. आणि सासरच्या फुले नावाप्रमाणे जन्मभर समाजाला फुलवित राहिल्या. त्याना उदंड आयुष्याचा पती लाभला तरी पुत्रलाभ झाला नाही. अखेरीस दोघांनी आपल्याच अनाथ बालिकाश्रमातील एका विधवेच्या मुलाला दत्तक घेतले. त्याला पुत्र मानून डॉक्टरी परीक्षेपर्यंत शिकविले. आणि हडपसरच्या ससाण्याच्या मुलीशी अखेरीस त्याचे त्या दोघानी मोठ्या थाटाने समाज पद्धतीप्रमाणे लग्न लावले.


मुलाच्या लग्नाचा आनंद नाही म्हटला तरी त्या दोघाना त्या कार्यापासून झाला. महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाची चळवळ कुठे शहरात तर कुठे खेडेगावात मूळ धरू लागली होती. शिक्षणाची गोडी बहुजन समाजाला लागू लागली होती. परमेश्वराने समाज सुधारणेचे महाराष्ट्रापुरते नेमून दिलेले वहुतेक कार्य जोतिबाने पूर्ण केले होते. अनेक कार्यकर्ते निर्माण केले होते. अखेरीस २७ नोव्हेंबर १८८९ या दिवशी पुण्यातील गंजपेठेत रात्री २ वाजून २० मिनिटांनी परमेश्वराची प्रार्थना करून त्यांनी या जगाचा निरोप घेतला.

जोतिबा गेले. पण त्यांचे कार्य आजतागायत चालू आहे. जोतिबांच्या वाणीचा, वचनाचा, आणि शिकवणीचा भलताच उलटासुलटा अर्थ अनेक महाशयांनी आपल्या स्वार्थासाठी वाटेल तसा लावला आहे. पण ब्राह्मणांचा द्वेष करणारे जोतिबा लोकमान्य आणि आगरकरांचा सत्कार करणारे होते. त्यांचे अनेक मित्र ब्राह्मण होते. न्या. रानडे आणि डॉ. भांडारकर यासारखे ब्राह्मण त्यांचे मित्र होते. प्रत्यक्ष सत्यशोधक समाजात सुद्धा इतर अनेक जातीच्या लोकांबरोबर काही ब्राह्मणही सामील झाले होते. मग जोतिबा फुले म्हणजे संपूर्ण ब्राह्मण जातीचा द्वेष करणारे होते असे म्हणणे योग्य होईल काय ?

जोतिबांचा रोख अन्याय करणारांविरुद्ध होता. समाजावर जे अनेक अन्याय करतात त्या विरुद्ध ते दंड थोपटून उभे राहिले होते. त्याकाळचा धार्मिक अन्याय शिगेला पोचला होता म्हणून त्यांना धर्मकृत्य करणाऱ्या भटाविरुद्ध लेखणी उचलावी लागली. आजच्या ब्राह्मणांची केविलवाणी स्थिती पाहून जोतिबांनी आपली लेखणी कशी उचलली असती बरे ?

१२६८ दि. २०।५।७
बा. वा.

# २. साने गुरुजी



आपल्या महाराष्ट्रात अनेक थोर शिक्षक होऊन गेलेत. त्याना मुलाच्या मनावर धर्म, संस्कृति, राजकारण यांचे संस्कार त्या त्या काळी बिंबविले म्हणून तर गेल्या दीडशे वर्षात महाराष्ट्रात अनेक थोर पुरुष निर्माण झाले. अशा थोर शिक्षकात साने गुरुजींचे नाव गुंफल्याशिवाय शिक्षकांची ही माला पूर्ण होऊ शकत नाही.

२४ डिसेंबर १८९९ या दिवशी कोकणातील पालगड या गावी त्यांचा जन्म झाला. मुलाचे नाव पांडुरंग असे ठेवण्यात आले. घरची अत्यंत गरिबी पण आई अत्यंत प्रेमळ. त्यावेळच्या रिवाजाप्रमाणे

पांडुरंगाची मुंज वयाच्या ६ व्या वर्षी झाली. त्याला पालगडच्या शाळेत घालण्यात आले. वर्गातील मुले जशी वागतील त्याप्रमाणे तो वागू लागला. मुले रोज शाळेतून घरी येताना फुले आणीत. त्याने एकदा सर्व मुलांच्या अगोदर जाऊन कळ्या तोडून आईजवळ आणून दिल्या. तेव्हा आई म्हणाली, बाळ कळ्या म्हणजे मुकी फुले. त्या तोडणे म्हणजे पाप. तशीच अर्धवट कामेसुद्धा फुलत नाही.

लहान मुले आभ्यासापेक्षा खेळण्यात रमतात. पांडुरंग सुद्धा असाच खेळण्यात रंगत असे. खेळताना हातपाय, कपडे घाण करत असे. अशा-वेळी आई त्याला पुन्हा दुसऱ्यांदा आंघोळ घाली. एकदा अशीच त्याला आंघोळ घालून झाल्यावर तिने आपल्या अंगावरच्या पातळाने अंग पुसले त्यावेळेला तो आंघोळीच्या दगडावर उभा होता म्हणून तो म्हणाला, " आई तुझे पातळ येथें दगडावर पसर त्यावर मी माझे ओले पाय टिपून मग कोरड्या जागेवर उडी मारीन म्हणजे माझ्या पायाला घाण लागणार नाही."

आईने तसे केले. पायाला घाण लागली नाही. म्हणून त्याला आनंद झाला तेव्हां ती त्याला म्हणाली, " पांडू पायाला घाण लागू नये म्हणून तू जपतोस तसाच मनाला घाण लागू नये म्हणून जपत जा. "

असा पांडू वाढत होता. शाळेत जात होता. आई त्याला शिकवित होती. पत्रावळ लावायला तो शिकला. पोहायला तो शिकला. रामरक्षा म्हणायला तो शिकला.

अशा रीतीने चार इयत्ता पालगड गावी पूर्ण झाल्यावर इंग्रजी शिक्ष-णाची सोय पालगडला नसल्याने त्यासाठी त्याला दापोली, मुंबई, औंध, पुणे इत्यादी ठिकाणी हिंडावे लागले. नातेवाईकांकडे राहावे लागले.

एकदा तो दापोलीला असताना सुट्टीत घरी आला होता. तेव्हां त्याला आपल्या धाकट्या भावाचा सदरा खूप फाटला आहे असे दिसले

आईने तो तीन ठिकाणी ठिगळे लावून शिवला होता. पांडुला ते पाहवले नाही. त्याने मनात काहीतरी ठरविले. पुढे गणेश चतुर्थीच्या दिवशी उत्सवासाठी तो घरी आला तेव्हा खाऊच्या पैशातून भावासाठी शिवून आणलेला कोट त्याने भावाला दिला. त्याला आनंद झाला. वडील म्हणाले, "कुठले रे पैसे?"

तो म्हणाला, "तुम्ही खाऊला दोन दोन आणे देत होताना ते पैसे मी जमवले आणि हा कोट शिवून आणला. स्वतःचे कपडे जुने असता धाकट्या भावासाठी असा नवा कोट शिवून आणलेला पाहून आई गहिवरून म्हणाली, "पंढरी, तू पैशाने मोठा नाहीस, पण मनाने मोठा झाला आहेस."

पंढरी मामाकडे शिकण्यासाठी राहात होता. मामाची बदली मुंबईहून पुण्याला झाली. मामीच्या मुलीला सांभाळून तो अभ्यास करी. पण मामी सतत त्याला बोले. तेव्हां एकदा तो पुण्याहून मुंबईला धाकट्या मामाकडे पळून गेला. आणि त्यांना मी पळून आलो असे सांगितले. तेवढ्यात पुण्याची तार आली. मुंबईच्या मामांनी त्याला बदडले. मामींनी त्याला जेवू घातले. आणि धाकट्या मामाने पुन्हा त्याला पुण्याला आणून पोहचविले.

पण मामाकडे पंढरीचा निभाव लागला नाही. अखेरीस मामाने या खोडकर मुलाला पालगडला नेऊन पोहचविले. वडील रागावले, संतापले बोलले आणि त्यांनी त्याला दापोलीच्या इंग्रजी शाळेत घातले. याच काळात पंढरीला वाचनाची गोडी लागली. आजोबांनी त्याला अनेक संस्कृत श्लोक शिकविले. रामायण, महाभारत ह्या कथाही त्याने वाचून काढल्या. पांडुरंग गणिताला घाबरत असे. अजून त्याचा खोडकर स्वभाव गेला नव्हता. खोडी केल्याबद्दल त्याला शाळेत आणि घरी शिक्षा होत असत.

पाचवीची परीक्षा झाली. पंढरीचा मित्र राम पुण्याला शिकण्यासाठी गेला. पण पांडुला फी देणे शक्य होईना. त्याला कोणीतरी सांगितले की औंधला राजेसाहेब मोफत शिक्षण आणि जेवण देतात. म्हणून तो औंधला जाऊन पोहोचला. पण आता त्याच्या दुर्दैवाने त्याचवेळी असा नियम झाला होता की संस्थानाबाहेरच्या मुलांना येथे मोफत अन्न मिळणार नाही. तेव्हां तो आणि त्याचा मित्र सखाराम सोवळे नेसून माधुकरी मागण्यासाठी बाहेर पडले. पण हे असे 'ओम भवति भिक्षां देहि' करणे त्याच्या मानी मनाला पटेना. लोकांची माधुकऱ्याविषयी भावना किती तुसडेपणाची आहे हे पाहून त्याने माधुकरी मागण्याचे बंद केले. महिना चार आणे भाड्याने त्याने एक खोली मिळविली. तिथे अंधार होता. ओल होती. पण ते दोघे तिथे राहू लागले. जवळचे पीठ संपले. पैसे संपले. उपास घडू लागला. तेव्हा तुकाराम नावाचा सहाव्या वर्गातील मित्र त्याला गिरणीत सांपडलेले पीठ गोळा करून आणून देऊ लागला. आणि ते दोघे मित्र असे हालात शिकू लागले. पुढे औंधला प्लेग सुरू झाल्याने तो आपल्या घरी गेला पण २०–२५ दिवस पंढरी गावी राहिल्याने वडिलांना वाटले हा पोरगा आता इथेच कायमचा राहणार. कामधंदा न करता खायला भार होणार. पंढरीच्या हे लक्षात येताच तो एके दिवशी आईला म्हणाला, "आई आता मी येथे राहात नाही."

आई म्हणाली, "त्यांच्यावर काय रागवतोस?"

परंतु त्याने आपला राग सोडला नाही. घर सोडण्याचा निश्चय केला. आईने त्याचे सदरे धूवून दिले आणि एक दुलई त्याला दिली. संक्रांतीचा तिळगूळ त्याला दिला. आईच्या पायावर डोके ठेवून तो निग्रहाने तेथून निघाला. पण हेच त्याचे आईचे शेवटचे दर्शन ठरले. पुन्हा त्याला त्याची प्रेमळ आई भेटली नाही.

पंढरी पुण्याला आला. आपला मित्र राम याच्याकडे उतरला. नूतन मराठी शाळेत त्याने नाव घातले. तीन दिवस डाळचुरमुऱ्यावर काढले. पुढे तो एकवेळ खानावळीत जेवू लागला. एकवेळ उपाशी राहू लागला. असे त्याने वर्षभर दिवस काढले. पण मित्राला पत्ता लागू दिला नाही. परीक्षा झाली. तो सहावी पास झाला. पुढे सुट्टीत रामच्या लक्षात आले की पांडू एकदाच जेवतो. तेव्हा रामच्या आईने त्याचे ओळखीच्या ठिकाणी वार लावून दिले. पण चारच वार मिळाले. मधील तीन दिवस पुन्हा पंढरी उपवास करू लागला. रामच्या घरी तो राही आणि त्याची अनेक कामे तो करी. एकदा रामची बहीण खूप आजारी पडली. पंढरीने तिची खूप सेवा केली. कोणतेही काम करण्यात त्याने कमीपणा मानला नाही.

खूप दिवसानंतर वडिलांनी पंढरीला अडीच रुपये आणि गणपतीच्या प्रसादाच्या दुर्वा पाठविल्या. पंढरी त्या दुर्वा नेहमी खिशात ठेवी खाण्याचे अत्यंत हाल होत असताही त्याने ते अडीच रुपये खाण्यासाठी खर्च केले नाहीत तर आपल्या मालकीची पुढील तीन पुस्तके त्याने विकत घेतली. रामकृष्ण वाक्सुदा, सुख आणि शांती, विवेकानंदाच्या मुलाखती.

मुलाचा अभ्यास बुडू नये म्हणून वडिलांनी त्याला आईचे आजारपण कळविले नाही. पण अखेरीस आई या जगातून गेल्याचे कळल्यावर तो खूप दुःखी झाला. पण अखेरीस त्याने स्वतःला सावरले. स्वतःचे आसू स्वतःच पुसले आणि तो आईचे दुःख मनात दाटत असता तसाच अभ्यासाला लागला. ते वर्ष मॅट्रिकचे असल्याने तो आणि राम कसून अभ्यास करीत असे. अखेरीस त्यांची परीक्षा झाली. १९१९ साली ते मॅट्रिक पास झाले.

पुढे पुण्याच्या न्यू पूना कॉलेजमध्ये त्या दोघांनी नाव घातले. त्याचा वाचनाचा हव्यास आता वाढला होता. मुद्देसुद आणि रसाळपणे

व्याख्यान तो देऊ लागला होता. अनेक प्रकारचे काबाडकष्ट करीत, खाण्यापिण्याचे हाल सोशीत पंढरी अखेरीस १९२४ साली एम्. ए. पास झाला. पण त्याचे कौतुक करायला त्याचे आई किंवा वडील कोणीच या जगात नव्हते.

पंढरी एवढा शिकला तरी त्याने आपला साधेपणा सोडला नाही. डोक्यावर लांबसडक शेंडी, गळ्यात पांढरे स्वच्छ जानवे, अंगात पांढरा शुभ्र लांब सदरा आणि धोतर असा त्यांचा साधा वेश असे. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते अंमळनेरला नोकरी करू लागले. फुले, मुले आणि पुस्तके ही त्यांना फार आवडत. त्यात ते रमून जात. अंमळनेर हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षकाचे काम पत्करले. शाळा जुनी होती. भव्य इमारत, मोठे क्रिडांगण, छात्रालय सारे कांही शाळेला होते. ह्या अशा शाळेत साने सर शिकवू लागले. ते सर्वस्व पणाला लावून मुलांना शिकवू लागले. हलके हलके साने सर शाळेत विद्यार्थीप्रिय शिक्षक झाले. ते कोठेही जाताना दिसले, तरी त्यांच्या हातात पुस्तक असायचे. सुट्टीच्या वेळात ते शिक्षकांच्या खोलीत इतर शिक्षकांप्रमाणे गाद्या, तक्याशी टेकून बसून गप्पा मारीत नसत. पान-तंबाखू खात नसत. तर वाचनालयात कपाटाच्या आड एका पायावर उभे राहून ते पुस्तके लावायचे, कोणाकडे त्यांचे लक्ष गेले तर किंचित् हसावयाचे.

साने गुरूजी म्हणजे हाडाचे शिक्षक. आपल्या जवळचे ज्ञान मुलांना कसे द्यावे यासाठी ते नाना युक्त्या करीत. त्यांनी हस्तलिखित दैनिक शाळेत सुरू केले. शाळेला थोडी देणगी देणारा तो दानशूर म्हणून त्याचे नाव दैनिकात लिहिले जाई. सापडलेली वस्तू दुसऱ्या विद्यार्थाला परत करणारा प्रामाणिक म्हणून त्याचे नांव दैनिकात लिहिले जाई. अभ्यासात प्रगती करणारा बृहस्पति ठरू लागला. आपले नांव या दैनि-

कात छापून यावे म्हणून विद्यार्थ्यात सद्गुणांची चढाओढ सुरू झाली. याच दैनिकात भारतातील आणि जगातील अनेक थोरांची स्फूर्तिपद चरित्रे गुरूजी गोड भाषेत मुलांना सांगत असत.

होता होता ते हस्तलिखित दैनिक इतके विद्यार्थीप्रिय झाले की शहरातील अनेक लोकांनी ते छापावे असे म्हटले. हरिभाऊ सोहोनी यांनी तर प्रत्यक्ष आर्थिक मदत दिली. शाळेचे प्रमुख गोखले यांनी परवानगी दिली आणि विद्यार्थी नावाचे मासिक छापील स्वरूपात सुरू झाले. आता साने सरांच्या कल्पनांना आणखीन वाव मिळू लागला. हे मासिक विद्यार्थी प्रिय तर झालेच पण लोकांतही ते प्रिय होऊ लागले. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या खेड्यातील पालकांनां लिहिले. साने सरांच्या गोड गोष्टीं वाचा, तेजस्वी चरित्रे वाचा, आम्हाला खाऊला पैसे नकोत पण आमच्या सानेसरांचे मासिक विकत घ्या. ”

१९२८ साली साने सरांचे हे विद्यार्थी मासिक खानदेशाच्या गावा-गावात पोहोचले. वर्गणीदार वाढले. खानदेश जागा झाला. राष्ट्रीय चळ-वळींचे पडसाद आणि गुलामगिरीची चीड त्यातील लेखात दिसू लागली. ब्रिटिश सरकारला हा विद्यार्थी राष्ट्रदूत बघवेना. सरकारने त्या मासिकावर बंदी घातली.

याच काळात साने सर शाळेच्या छात्रालयाचे प्रमुख म्हणून काम पाहात होते. गोखल्यांनी वसतीगृहाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. साने सर मोठ्या पहाटे उठत आणि स्वतः छात्रालयाची घंटा वाजवित. त्या घंटेने विद्यार्थी जागे होत. मुखमार्जनादी झाल्यावर मुले हॉलमध्ये प्रार्थनेसाठी जमत. रामाच्या तसविरीसमोर उदबत्ती लावली जाई. फुले वाहिली जात. मुलांच्यामध्ये ते उभे राहात आणि रामाची प्रार्थना सुरू होई.

साने सर छात्रालयातल्या मुलांवर केवळ देखरेख करीत नसत तर ते आईच्या मायेने त्यांची काळजी घेत. त्यांच्या आजारपणात केवळ डॉक्टरावर ते अवलंबून राहात नसत. डॉक्टरांचे औषध आणि सान्यांचे प्रेम यामुळे आजारी बालक बरा होई.

एकदा त्यांच्या खोलीतील हरणाचे कातडे खूप जुने झाल्याने जागोजाग फाटले होते. तडवी नावाच्या एका विद्यार्थ्याने ते आंघोळीला गेले असता जुने फाटके मृगाजीन लपविले. आणि त्या जागी नवे मृगाजीन आणून ठेवले. साने सर आंघोळीहून आले. त्यांनी नवीन मृगाजीन पाहिले. मुलांना विचारले तसा तडवी अभिमानाने सांगू लागला, " दिवाळीच्या सुट्टींत गावी गेलो होतो तेव्हा घोड्यावर बसून रानात गेलो. हरणांचा कळप पाहिला त्यात एक काळवीट होता. घोड्याला पाहाताच हरणे उधळली. धावता धावता काळवीटाची शिंगे झाडीत अडकली. तसा मी बंदुकीचा चाप ओढला. गोळी लागून काळवीट मेले. त्याचे कातडे काढले. ते कमविले. आणि तुमच्यासाठी घेऊन आलो. "

साने सरांनी तडवीचे आपल्यावरील प्रेम ओळखले. त्याच्या पाठीवरून ते हात फिरवीत होते. त्यांचे डोळे पाण्याने भरून आले. ते म्हणाले, " बाळ माझ्यासाठी तू एका निरापराधी प्राण्याला ठार केलेस. " तडवीचे डोळे भरून आले. तो म्हणाला, " सर यापुढे मी हरीण मारणार नाही. "

साने सर अनेक मुलांना दरमहा मदत करीत. त्यांनी स्वतःचा प्रपंच थाटला नव्हता, पण गरीब मुलांना ते सतत फी ची मदत करीत. त्यांना मन लावून शिकवित. मुले जे खात तेच साने सर छात्रालयात खात. सान्यांची ही तळमळ, हा त्याग पाहून शाळेचे प्रमुख गोखले सर अगदी भारावून गेले. एकदा रात्री ८ वाजता सान्यांना भेटायला ते छात्रा-

लयात आले. ते त्यांना म्हणाले, "तुम्ही अनेकांचे संसार चालविता. तुम्ही दोन वेळा माझ्याकडे जेवायचे. नाही म्हणू नका."

साने सर गोखल्यांच्या घरी जेवू लागले. पण लोणकढे तूप, चांगल्या गव्हाची पोळी, ताक, पापड असे चांगले अन्न त्यांच्या घशाखाली उतरत नसे. मुलांची भाजी भाकरी त्यांच्या डोळ्यापुढे येई. अखेरीस त्यांनी गोखल्यांना पत्र लिहिले, "तुमच्याकडील चांगले जेवण मी घेऊ शकत नाही. क्षमा करा."

आणि त्या दिवसापासून पुन्हा ते छात्रालयात मुलांबरोबर जेवू लागले. पुन्हा गोखले सान्यांच्या खोलीत एक दिवस आले. रोडावलेल्या सान्यांच्या प्रकृतीकडे पाहात ते म्हणाले, "साने मी तुमची आबाळ माझ्या डोळ्याने पाहाणार नाहीं. तुम्हाला पोळी तूप नको असेल तर शिळा भात फोडणी घालून देईन."

साने सर मुलांना शिकवीत होते. राष्ट्रभक्तीच्या गोष्टी सांगत होते. स्वतः व्रतस्थ वागून त्यागाचा आदर्श विद्यार्थ्यांपुढे ठेवीत होते. १९३० साल उजाडले. देशात दांडीचा सत्याग्रह सुरू झाला. त्या चळवळींच्या बातम्या वर्तमानपत्रातून येऊ लागल्या. देशप्रेमी तरुणांची मने त्यामुळे अस्वस्थ झाली. साने सर अस्वस्थ झाले. ते वर्गात जात पण त्यांचे मन शिकवण्यात रमत नव्हते. अखेरीस त्यांनी शाळेचा निरोप घ्यायचे ठरवले. गोखल्यांनी त्यांना घरी जेवायला बोलावले. गोखलेबाईंनी चांगला गोडधोड स्वयंपाक केला. एरवी जेवताना हात आखडणारे साने त्यादिवशी पोटभर जेवले.

रात्र झाली. अंधार पडू लागला. साने विहिरीवर गेले. त्यांनी मुलां-बरोबर लावलेल्या फुलझाडांना भरपूर पाणी घातले. रात्रीचा एक वाजला. छात्रालयातील मुले झोपली होती. एकदा मुलांना डोळे भरून पाहिले. ज्यांच्या अंगावर पांघरुण नव्हते त्यांच्या अंगावर पांघरूण घातले.

डोळ्यातली आसवे पुसून ते बाहेर आले. बागेतल्या वृक्ष-वेलींचा त्यांनी हात जोडून निरोप घेतला. विहिरीजवळ येऊन ते उभे राहिले. तिच्या काठावर त्यांनी दोन फुले ठेवली. गोखल्यांच्या दाराशी आले. त्यांच्या पायरीशी दोन फुले ठेवली. असा साऱ्यांचा त्यांनी निरोप घेतला. पायात जोडा नाही. अंगात कोट नाही. हातात सामान नाही. असे साने गुरुजी स्टेशनच्या रस्त्याला लागले. तिकिट काढून ते गाडीत बसणार तेवढ्यात त्यांच्या नकळत आलेले गोखले सर त्यांना दिसले. साने गुरुजींना त्यांनी घट्ट मिठी मारली. कठोर गोखल्यांच्या डोळ्यात आसू होते. गोखले म्हणाले, "साने आजपर्यंत मी एकदाच रडलो होतो. माझ्या थोरल्या भावा करता. आणि आता माझ्या धाकट्या भावाकरता."

अशा रितीने साने सरांनी शाळा सोडली. ते खेडोपाडी हिंडू लागले. लोकांना सरकारच्या अन्यायाविरुद्ध भडकवू लागले. सरकारने त्यांना पकडले आणि धुळ्याच्या जेलमध्ये ठेवून दिले. येथेच त्यांनी आस-पासच्या कैद्यांना गोड गोष्टी सांगितल्या. त्यांचे बहुतेक लिखाण असे सक्तीच्या विश्रांतीत लिहिले गेले आहे. तुरुंगातल्या राजकीय कैद्यातसुद्धा साने गुरुजी प्रिय झाले. तेव्हां सरकारने त्यांना तेथून उचलले आणि जिथे मराठी बोलले जात नाही अशा त्रिचनापल्लीच्या तुरुंगात ठेवले. आणि येथेच प्रांत भारतीची कल्पना त्यांना सुचली.

गांधी आयर्विन करार झाला आणि साने गुरुजींची इतर राजकीय कैद्यांबरोबर सुटका झाली. पुन्हा ते काँग्रेसचा प्रचार खानदेशात करू लागले. पुन्हा सरकारने त्यांना पकडले. धुळ्याहून नाशिकच्या जेलमध्ये त्यांची रवानगी झाली. तिथे त्यांनी धडपडणारी मुले ही आपली कादंबरी लिहिली.

१९३४ साली काँग्रेसने कौन्सिल प्रवेश करण्याचे ठरविले. गुरुजी नाशिक जेलच्या बाहेर पडले. खेड्यापाड्यातून हिंडू लागले. पहाटे

जात्यावर दळताना स्त्रियांच्या ओव्या त्यांच्या कानावर पडू लागल्या. साने गुरुजींनी स्त्री जीवनाची व्यथा आणि कथा सांगणाऱ्या त्या ओव्या गावोगाव हिंडून जमा केल्या आणि त्या पुस्तक रूपाने प्रसिद्ध केल्या.

याच कालखंडात त्यांनी चार दिवसात २७० पानांचा 'भारतीय संस्कृति' हा ग्रंथ लिहिला. त्यांच्या या पुस्तकाने त्यांचे भारतीय संस्कृती विषयीचे प्रेम आणि तिची त्यांनी केलेली फोड सामान्य वाचकाला सुद्धा भुरळ पाडते.

१९३६ साली फैजपूरची काँग्रेस त्यांच्या आणि एस. एम. जोशींच्या परिश्रमामुळे यशस्वी झाली. अपार परिश्रम घेऊन त्यांनी हे अधिवेशन यशस्वी करून दाखविले. त्यांना स्वागताध्यक्षपद देण्यात आले. पण ते त्यांनी नम्रतापूर्वक नाकारले.

काँग्रेसने असहकारितेचा त्याग केला. मंत्रीमंडळे स्वीकारली. काँग्रेस नावाचे साप्ताहिक साने गुरुजींनी १९३८ साली सुरू केले. पण त्यातील प्रखर लेखाने ब्रिटिश सरकार भडकले. आणि अखेरीस ते साप्ताहिक बंद पडले.

साने गुरूजींनी आपल्या आयुष्यात जवळ जवळ ८० पुस्तके लिहिली. काव्य आणि कारुण्य यांचा संगम त्यांच्या लिखाणात आढळतो. साधी भाषा, सोपी वाक्ये हे त्यांचे विशेष होत. 'श्यामची आई 'वाचून रडणार नाही असा वाचक सापडणे विरळा. 'गोड गोष्टी, क्रांती, आस्तिक' ही पुस्तके वाचताना किशोर मुले तहान-भूकसुद्धा विसरून जातात. 'भारतीय संस्कृती, गीता हृदय आणि पत्री ही पुस्तकें प्रौढ वाचकांनासुद्धा विचार करायला लावतील. त्यांनी खूप लिहिले. त्यात अनेकवेळा त्याच त्याच गोष्टीची पुनरावृत्ती झालेली आहे. पाल्हाळ

आलेला आहे. अनेकांनी त्यांच्यावर टीका केलेली आहे १९४६ धुळे येथे साने गुरूजी यासंबंधी म्हणाले–

"कुणी म्हणतात माझ्या लेखनात पाल्हाळ असतो. पण तो अर्थहीन असतो का ? समुद्राच्या काठी बसणाऱ्या एखाद्या अरसिकाने त्याच्या लाटांकडे पाहून म्हटले, 'सागरा काय रे तुझा पाल्हाळ हा' तर 'अशा' अरसिकाच्या बुद्धीची कीवच करावी लागेल. माझे लिखाण समाजासाठी आहे."

अन्याय आणि जुल्म जिथे दिसेल तिथे साने गुरूजी धावून जात. तो अन्याय आपल्या देशबांधवांनी केला तरी ते त्याचा प्रतिकार करीत. या गुणधर्मामुळेच त्यांनी प्रताप मिलच्या मजुरांना गिरणी मालकाविरुद्ध लढा देऊन त्यांना न्याय मिळवून दिला. ४२ च्या चलेजाव ठरावानंतर देशात ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा सुरू झाला. त्यावेळीं साने गुरूजींनी तरुणांना योग्य मार्गदर्शन केले. ४३ साली त्यांना पुन्हा अटक करण्यात आली. १९४५ साली त्यांची सुटका झाली. पण गुरुजी बाहेर आल्यावर स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी ४२ च्या क्रांतीयुद्धात जे वीर ब्रिटिशांच्या गोळ्यांना बळी पडले–त्यांची चरित्रे महाराष्ट्राला आपल्या ओजस्वी भाषेत सांगितली. वीस, वीस हजार लोकांचा समुदाय त्यांचे भाषण ऐकताना तल्लीन होऊन जाई आणि डोळ्यातून आसवे गाळू लागत, नंदूरबारचा छोटा शिरिषकुमार, माथेरानचा वाघासारखा कोतवाल, नऊ गोळ्यांना भीक न घालणारा वडुजचा परशुराम पहिलवान, फासावर चढलेला कराचीचा हेमू कलाणी आणि नागपूरचा विष्णु अशा कितीतरी १९४२ च्या वीरांचे वीरश्रीचे पोवाडे त्यांनी महाराष्ट्राला ऐकविले.

१९४६ साली पुण्याला कुमार साहित्य संमेलन भरलें होते. गुरूजींनी अध्यक्षपदावरून मुलांना मोलाचा उपदेश केला. ते म्हणाले,

" काल्पनिक जाळी विणू नका तुमचा आत्मा विराट जनतेच्या आत्म्याला भिडवा. विशाल सहानुभूतीशिवाय थोर सारस्वत संभवणार नाही. "

सेनापती बापट आणि सानेगुरूजी यांनी हरिजनांना मंदिर-प्रवेश मिळवून देण्यासाठी आंदोलन सुरू केले. महाराष्ट्रभर ते दोघे हिंडले आणि अखेरीस महाराष्ट्राचे भक्तीहृदय–पंढरीच्या विठोबाचे मंदिर–हरिजनांना खुले करता यावे म्हणून ते दोघे पंढरपूरला येऊन पोहोचले. आपल्या तर्कशुद्ध वाणीने त्यांनीं तिथे जमलेल्या हजारो लोकांना आपली भूमिका समजावून सांगितली आणि त्यांनी एक मे पासून उपोषणाला सुरवात केली. मधु लिमये त्यांच्याजवळ सारखे बसून होते. डॉक्टर भडकमकर त्यांची प्रकृती रोज तपाशीत होते. एक एक दिवस लोटत होता त्यांची प्रकृती क्षीण होत होती. स्वयंसेवक प्रभातफेरीला जात होते पण पुजाऱ्यांना पाझर फुटेना.

असे करता करता १० दिवस उपवासाचे निघून गेले. अनेक मोठी माणसे पंढरपूरला आली. पुजारी बडवे याच्यांशी मावळणकर, आप्पासाहेब पंत आणि ठक्करबाप्पा यांच्या वाटाघाटी झाल्या. अखेरीस सह्या झाल्या. आणि पंढरपूरचे विठोबा मंदिर हरिजनांना खुले झाले. साने गुरुजी मंदिरातील पांडुरंगाला अशा दिव्यानंतर कडकडून भेटले.

शेकडो वर्षे महाराष्ट्राच्या साधुसंतांना जे जमले नाही ते कार्य या आधुनिक संताने आपले प्राण पणाला लावून पूर्ण केले.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला. पण भारताची पाकिस्तानच्या निर्मितीतून फाळणी झाल्याने हिंदु मुसलमानांचे दंगे निर्माण झाले. स्वातंत्र्य मिळाले पण आपसातील भांडणतंटे सुरू झाले. निर्वासितांच्या प्रश्नातून अनेक प्रश्न स्वतंत्र भारतापुढे निर्माण झाले. संतांप्रमाणे सर्वां-

वर प्रेम करणारे साने गुरुजी, त्यांनी आपले विचार स्पष्टपणे लोकांना कळविता यावे म्हणून १५ ऑगस्ट १९४८ रोजी साधना साप्ताहिक सुरू केले. मातेच्या ममतेने ते आपल्या बरोबरीच्या लोकांशी सदाच वागत आले. साधनेच्या पत्त्यावर त्यांना अनेक दुःखितांची पत्रे यायची. कुणी विधवा, कुणी हरिजन, कुणी विद्यार्थी त्यांच्याकडे आपली कथा सांगून आर्थिक मदत मागत. गुरुजींनीं कधीच कोणाला नाही म्हटले नाही.

१९५० साल उजाडले. स्वातंत्र्य मिळूनही राष्ट्र सुखी झाले नव्हते. लाखो निर्वासितांचे आक्रोश प्रतिध्वनी त्यांच्या कानावर पडत होते. समाजवादाचा प्रचार त्यांनी साधनेतून आणि ठिकठिकाणी व्याख्याने देऊन केला.

९ जून १९५० ! हा दिवस साने गुरुजींच्या आयुष्यातला शेवटला ठरावा असा जणू विधिसंकेत असावा. बहुधा गुरुजींनीच ते ठरविले असावे. भेट म्हणून आलेले आंबे त्यांनी सर्वांबरोबर आनंदाने खाल्ले. नंतर १२ वाजता कोरे धोतर घेऊन आले. नवे कपडे अंगात घातले. मधु लिमयेला शेवटचे पत्र लिहिले—

"मधु मला देवाघरचे बोलावणे आले आहे. माझ्या डोक्यात असहाय्य वेदना होत आहेत. मी आता झोपेच्या गोळ्या घेणार आहे. त्यामुळे कदाचित मला चिरनिद्रा लागेल. लोकशाही समाजवादाची पताका व मानवतेची मान उंच राहील असे वर्तन ठेवा. म्हणजे मला समाधान लाभेल." सर्व निरवानिरव झाल्यावर आगरकरांप्रमाणे त्यांनी आपल्या प्रेत दहनार्थ लागणाऱ्या पैशांची पुरचुंडी बांधून ठेवली. आणि झोपेच्या गोळ्या घेऊन ते अंथरुणावर जाऊन झोपले. ती त्यांची काळनिद्रा ठरली

हजारो लोकांनी दुसऱ्या दिवशी त्यांचे दर्शन घेतले. लाखो लोक त्यांच्या स्मशानयात्रेला समुद्रकाठी जमले. साने गुरुजींच्या प्रेमळ देहाला चितेवर अग्निज्वाला लपेटीत होत्या. लोकांच्या डोळ्यातून आसू वाहात होते. सेनापती बापट डोळ्यातील आसू पुशीत म्हणाले, "गुरुजींचे साहित्य अमर आहे."

"आचार्य अत्रे म्हणाले, "महाराष्ट्राचे पावित्र्य आणि मांगल्य आज निमाले आहे."

# मुलांनो, तुम्हांला काय आवडते ?

आम्हांला गोष्टी आवडतात–
राजांच्या, राक्षसांच्या, जादूच्या, पऱ्यांच्या–
“ वा–फारच छान ”
हा पहा गोष्टींचा खजाना

तर मग हा खजाना आपण घ्याच व आनंद लुटा–मनोरंजन–करमणूक व त्याचबरोबर ज्ञानवृद्धी.

**यासाठीं खालील पुस्तकें वाचा**

मूल्य १·५० प्रत्येकी

* मजेदार गोष्टी
* सोनेरी गाय व इतर गोष्टी
* लाल परी व इतर गोष्टी
* जादूचा हिरा व इतर गोष्टी
* शेवंतीचे फूल व इतर गोष्टी
* चतुर इसाप
* जिजाबाई
* सागरपरींच्या कथा व इतर गोष्टी
* चतुर राजकुमार
* अग्निनारायणाचा प्रसाद
* सुरस अरेबियन कथा
* ताई मला ओवाळ
* आधारवड व इतर गोष्टी

## आ गा मी  प्र का श नें –

* जुळे भाऊ
* दादोजी कोंडदेव
* रक्त सांडले स्वातंत्र्यासाठी
* राजे शहाजी
* समर्थ रामदास

# मजेदार गोष्टींची पुस्तकें

## किंमत प्रत्येकी चाळीस पैसे

लेखक : अ. र. भालदार

* सोनेरी गाय
* जादूचा हिरा
* राक्षसाचा पाय
* जादूचा मासा
* लाल परी
* कुबडा हकीम
* अरे बापरे भूत
* उडत्या पादुका
* रोगी राक्षस
* बोलणारा पुतळा
* जादूची बाहुली
* हंसरे झाड
* हरिणीचा श्राप

लेखक : श्रीमती रहाळकर

* शेवंतीचे फूल
* जादूची कोंबडी
* कापसाची किमया
* कुठे असतो देव

लेखक : श्री. रहाळकर

* तारानगरी
* बिंबानगरी

लेखक : श्री. कृष्ण पोवळे

* गाणारा बुलबुल
* जादूचा मोती
* फुलराणी
* मायाजाल

लेखक : कृष्णकांत चेके

* चंद्रशेखर
* शरश्चंद्र
* शिरीषकुमार

लेखक : प्रभाकर अत्रे

* आधारवड
* गुलाबी राक्षस
* गंपू पाण्यावरून चालतो

लेखक : द. ग. कुलकर्णी

* विषारी विहीर

लेखक : वि. के. फडके

* लोभाचे प्रायश्चित्त

## किंमत प्रत्येकी पन्नास पैसे

लेखक : दत्ता जी. कुलकर्णी

* दोन महान संत
* दोन महान समाजसेवक
* आदर्श गुरुशिष्य

अरगडे कुलकर्णी प्रकाशन, पुणे – १



BVBK-0401268